# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०७/२०२५ (बुधवार)**

---

## वाहनांच्या बॅटरी चोरी करणाऱ्या २ आरोपीतांना अटक
## ८ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :– पोलीस स्टेशन उमरेड येथे फिर्यादी नामे मोहम्मद परवेज जैनुलहक अन्सारी, वय. ४३ वर्षे, व्यवसाय. ट्रान्सपोर्टर, रा. उमरेड, जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, दिनांक १०/०७/२०२५ रोजी रात्री १०:०० ते दिनांक ११/०७/२०२५ चे सकाळी ०७:०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी यांच्या मालकीचे ट्रेलर ट्रक क्रं १) एम.एच.४० सी.टी ६०२० २) एम. एच. ४३ यु ६४१५ हे वायगाव घोटुर्ली येथील क्रिष्णा बार च्या समोरील रोडच्य कडेला उभे करून ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोरटयांनी नमुद दोन्ही ट्रेलर ट्रक मधील एक्साईड कंपनीच्या ४ बॅटऱ्या काढुन नेल्या. तसेच सदर घटनास्थळापासुन काही अंतरावर उभ्या असलेले ट्रेलर ट्रक क्र ३) एम.एच. ४० सी.डी ६७८०, ४) एम.एच. ४० बी.जी. ८०४५ ५) एम.एच. ३४ बी.झेड ०३६८ अशा वाहनांमधील ६ बॅटऱ्या तसेच मकरधोकडा येथील टिप्पर क्रमांक ६) एम.एच. ४० ए.के ४०६५, ७) ट्रक्टर क्रमांक एम.एच. ४० एल. २५२२ ८) ट्रक्टर क्रमांक एम.एच. ४० एल.२६३ ९ ) कॉलीस क्रमांक एम.एच. ३१ ए. एच. ४५२८ मधील ५ बॅटऱ्या अशा एकुण १५ बॉटऱ्या किंमती १,८०,००० /– रूपये असा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेल्या अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन उमरेड येथे अप क्रं ५२७/२०२५ कलम ३०३(२) भा.न्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

उमरेड पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू करत गुप्त बातमीदारांकडुन माहीती काढुन आरोपी क्रं १ निसार कादीर शेख, वय ३६ वर्षे , २. रफिक वहीद खान, वय ४० वर्षे, दोन्ही रा. मोठा ताजबाग नागपुर जि. नागपुर यांना सदर गुन्हयाच्या तपास कामी

ताब्यात घेतले. आरोपीतांना गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. दोन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे. आरोपीतांच्या ताब्यातुन चोरी गेलेल्या एकुण १५ बॉटऱ्या किंमती १,८०,००० /— रूपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तसेच गुन्हयात वापरलेले वाहन क्र एम.एच. ४९ बी.के ९२७० किंमती ६,२५,०००/— रूपये असा एकुण ८,०५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## पाकीट मार महीलेचा २ तासात घेतला शोध
## काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १५/०७/२०२५ रोजी पोलीस स्टेशन काटोल येथे फिर्यादी नामे मंगेश मनोहर ढोबले,रा. लाडगाव ता. काटोल, जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, फिर्यादी हे आठवडी बाजार असल्याने काटोल येथे आले असता बाजार करत असताना फळाचे हातगाडीवरून अनारचे फळे घेते वेळी फिर्यादीचे मागे एक अनोळखी महिला होती तेवढयात फिर्यादीचे पॅन्टचे खिशाला धक्का लागला परंतु फिर्यादीने लक्ष दिले नाही परंतु पैसे देने करिता पॅन्टच्या मागच्या खिशात हात टाकला असता पैसे दिसले नाही फिर्यादीचे मागे असलेली अनोळखी महीला हिने पॅन्टचे मागील खिशातुन ७५००/— रू. चोरी केलेले आहे अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

काटोल पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू करत गुप्त बातमीदारांकडुन माहीती काढुन अवघ्या २ तासात एका महीला आरोपीला ताब्यात घेतले. नमुद महीला आरोपी ही पळुन जाण्याच्या तयारीत असतांना काटोल बसस्टॅड येथुन ताब्यात घेवुन गुन्हयासंदर्भात विचारपुस केली असता तिने सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. आरोपीच्या ताब्यातुन संपुर्ण मुद्देमाल **रोख रक्कम ७,५०० /— रूपये जप्त केले**.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## ५ गोवंश जनावरांची सुटका,काटोल पोलसांची कामगिरी
## १ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १५/०७/२०२५ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, टाटा एक्स छोटा हत्ती चारचाकी वाहना मध्ये

अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस नमुद वाहनाचा शोध घेणे कामी पेट्रोलींग करीत पारडसिंगा मार्गे जात असतांना मौजा खानगाव येथे टाटा एक्स छोटा हत्ती चारचाकी वाहन क्र. एम.एच.३१, सी.क्यु. ५९०८ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन चालकाला नाव पत्ता विचारले असता चालक **आरोपी नामे राकेश शिवदयाल अनुबेलिया वय.२८ वर्ष, रा. फल्ली मार्केट काटोल, ता.काटोल ,**अशी माहीती समजली. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **५ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावर खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक** टाटा एक्स छोटा हत्ती चारचाकी वाहन क्र. एम.एच.३१,सी.क्यु.५९०८ **किंमती १,००,०००/— रूपये. व ५ गोवंश जनावरे किंमती ५०,००० /— रूपयाचा एकुण १,५०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला**.

**नमुद प्रकरणी चालक आरोपी नामे** राकेश शिवदयाल अनुबेलिया, वय.२८ वर्ष रा. फल्ली मार्केट काटोल ता. काटोल **याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम सहकलम २२३ भा.न्या.सं,** ८३/१२५(ई),२३(१)/१७७ मोवाका. **अन्वये गुन्हा नोंद केला आहे.** .

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १५/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १६/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन आरोली अंतर्गत अरोली, कोदामेंढी, खात, श्रीखंडा, पिंपळगाव, चोखाळा, नांदगाव येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि कोदामेंढी चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन पारशिवणी अतंर्गत पारशिवणी आणि दहेगाव जोशी, आणि शिवाजी चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल

रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार सोबत दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते.












GOODS
CARRIER
ASHOK LEYLAND



## विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात नागरीकांचा सहभाग नोंदविण्याबाबत..

महाराष्ट्र सरकार विकसित महाराष्ट्र २०४७ साठी एक व्हिजन डॉक्युमेंट तयार करीत आहे. या व्हिजन डॉक्युमेंट मध्ये नागरिकांच्या आकांक्षा प्रतिबिंबित व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे दिनांक १८ जुन २०२५ ते १७ जुलै २०२५ या कालावधीत नागरीक सर्वेक्षण केले जात आहे. या सर्वेक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजनला आकार देण्यासाठी नागरिकांना आमंत्रित करण्यात येत आहे.या सर्वेक्षणामध्ये ७ सोपे प्रश्न विचारले आहे. या प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी नागरिक https://wa.link/o९३s९m ही लिंक ओपन करून ऑप्शन निवडु शकतात, लिहु शकतात आणि आवाज रेकॉर्ड करू शकतात.

नागपुर ग्रामीण जिल्हयातील नागरीकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, https://wa.link/o९३s९m ही लिंक ओपन करून विकसित महाराष्ट्र २०४७ बाबत सर्वेक्षणात आपला सक्रिय सहभाग दिनांक १७ जुलै २०२५ नोंदवावा.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने